# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

## मिरा-भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्र राज्यातील पहील्या "कॅम्पस प्लेसमेंट@MBMC या उपक्रमाचा शुभारंभ

मा. मुख्यमंत्री श्री एकनाथजी शिंदे यांनी जाहीर केलेल्या मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजनाची अंमलबजावणी मिरा भाईंदर महानगर पालिकेच्या वतीने करण्यात आली गरीब गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणसोबत रोजगाराची संधी उपलबध करून देण्यासाठी मिरा भाईंदर पालिकेचे आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली *कॅम्पस प्लेसमेंट@ Mbmc या अभिनव उपक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे .आजपर्यंत मोठमोठ्या इंजिनियरिंग महाविद्यालयात नामांकित कंपन्या तसेच विविध संस्थेतर्फे असे उपक्रम राबविण्यात येतात. पण याला अपवाद म्हणजे मीरा भाईंदर महानगर पालिका.मिरा भाईंदर शहरात कॅम्पस प्लेसमेंट देणारी महाराष्ट्र राज्यातील पहिली महानगर पालिका ठरली आहे.

Emplomblity@18 आणि center of excellence Education सारख्या उपक्रमांत गरीब गरजू विद्यार्थ्यांसाठी शिक्षणासोंबत रोजगार उपलब्ध होऊन त्यांना आर्थिक पाठबळ मिळावे यासाठी ठोस उपाय योजना केली आहे. महानगर पालिकेने Tata strive सारख्या नामांकित कंपनी द्वारे महानगर पालिकेच्या कॅम्पस प्लेसमेंट@Mbmc या उपक्रमाअंतर्गत शालेय व्दियार्थ्यांची विशेष चाचणी घेऊन त्यांच्या आवडीनिवडी, कौशल्य तसेच त्यांचा एकंदरीत कल कोणत्या क्षेत्रात आहे याचा सखोल अभ्यास केला गेला आणि 14 ऑगस्टला माननीय आयुक्त यांच्या तर्फे निवड झालेल्या 40 विद्यार्थ्यांना कंपनीच्या आधीच मिरा भाईंदर महानगर पालिके तर्फे तात्पुरते नियुक्त पत्र प्रधान करण्यात आले त्यामुळे विद्यार्थ्यांना रोजगारासोबत पगार ही मिळू लागेल् आणि आर्थिक पाठबळ ही मिळेल

कॅम्पस प्लेसमेंट@Mbmc या अभिनव उपक्रमाला tata strive सारखी नामांकित कंपनी जोडली गेली आहे ती कंपनी या उपक्रमाअंतर्गत महानगर पालिकेच्या विद्यार्थ्यांची चाचणी घेत त्यांची निवड करून त्यांना विविध क्षेत्रातील विशेष प्रशिक्षण देते. आणि प्रशिक्षण झाल्यावर रोजगार नियुक्त पत्र दिले जाते.अशी सर्वसाधारण कार्य प्रणाली असते आज tata strive सारखी कंपनी या अभिनव उपक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी जोडली गेली आता या पुढे ही अशाच अनेक नामांकित कंपन्या यात मनापासून सहभागी होतील आणि शहरातील गरीब गरजू िद्यार्थ्यांसाठी रोजगाराची नवी दालने खुली करतील यात तिळमात्र शंका नाही

या कॅम्पस प्लेसमेंट@ Mbmc हा अभिनव उपक्रम प्रत्यक्षात आणण्यासाठी महानगर पालिका अतिरिकत आयुक्त अनिकेत मानोरकर, उपायुक्त प्रसाद शिंगटे आणि शहर अभियंता दिपक खाबित यांनी ही सक्रिय सहभात घेतला होता.

मीरा भाईंदर महानगर पालिकेने आज निवड केलेल्या 40 विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याधीच तात्पुरते स्वरूपातील नियुक्त पत्र दिले यानंतर हा आकडा नक्कीच वाढत जाईल आणि मिरा भाईंदर शहरातील गरीब गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणानंतर नोकरी संदर्भात होणारी परवड संपून त्यांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न मार्गी लागेल यात काहीच शंका नाही